**प्रेसनोट**

दि.०१/०९/२०२२

## लोणी काळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील पोलीस हवालदार व खाजगी इसमावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | लोणी काळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ४६८/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७, ७अ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३१ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक - मुकुंद शंकर रणमोडे, वय - ४९ वर्षे.<br>पद - पोलीस हवालदार, लोणी काळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर<br>२) गजेंद्र माणिक थोरात, वय - ३५, खाजगी इसम (निलंबित होमगार्ड) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- ( पाच हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २,०००/- (दोन हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- ३०/०८/२०२२
सापळा दिनांक :- ३१/०८/२०२२.
ठिकाण :- लोणी काळभोर पोलीस स्टेशनचे आवारात.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्याविरूद्ध मा. न्यायालयाने काढलेल्या अजामीनपात्र वॉरंटमध्ये अटक न करणेसाठी लोकसेवक पोलीस हवालदार रणमोडे यानी लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांच्याविरूद्ध मा. न्यायालयाने काढलेल्या अजामीनपात्र वॉरंटमध्ये अटक न करणेसाठी तक्रारदार यांचेकडे ५ हजार रूपयेची लाच मागणी करून त्यापैकी २ हजार रूपये स्वीकारल्यावर रंगेहात ताब्यात घेऊन वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करून दोघांना दि.३१/०८/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक विजयमाला पवार तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.